स्थापना: २०/९/१९९०

'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' – कर्मवीर

रयत शिक्षण संस्थेचे

# कन्या विद्यालय

पिंपरी वाघेरे, पुणे – ४११ ०१७

संस्थापक : पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील, डी.लीट्.

e-mail: pimpri.kanyavwr@gmail.com

मो. २७४११३९६

शाळेचे कोड नंबर्स
एस. एस. सी. बोर्ड
११. १५. ०९८
युडायस कोड
२७२५११९०२००३
वेतन पथक
पीएनए (एच) १८५

शाळा मान्यता क्र. : एस. एस. एन. १३८९/२०९३/माशि– ३ शिक्षण व सेवायोजना विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ दि. २७/७/१९९०

जावक नं.

दिनांक :

प्रति,

मा. शिक्षणाधिकारी सो,

जिल्हा परिषद, पुणे –1

यांना ..................

**विषय :–शाळेच्या प्रथम मान्यता मूळप्रती बाबत. तथा मुलींची शाळा स्वतंत्र विभाजन झाले बाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयानुसार सविनय कळवू इच्छिते की, सन. 1982 पासून नवमहाराष्ट विदयालय, पिंपरी वाघेरे पुणे , हे मुला–मुलींचे एकत्रित विदयालय होते. तदनंतर **महाराष्ट्र शासन, आदेश** क्रमांक एसएसएन /1389/2093/मा.शि.–1 शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई–32 यांचेकडिल दिनांक 27 जुलै 1990 अन्वये, रयत शिक्षण संस्थेच्या, पुणे जिल्हयातील–03 शाळा व अहमनगर जिल्हयातील–07 शाळा अशा एकूण दहा माध्यमिक शाळा **जून 1990 पासून** मुलांची व मुलींची अशा दोन स्वतंत्र शाळा विभाजन करण्याची परवानगी देण्यात आली.

पुणे जिहयातील सदरच्या 03 शाळामध्ये नवहाराष्ट विदयालय, पिंपरी–वाघिरे, पुणे यांचा समावेश असून, नवहाराष्ट्र विदयालय, पिंपरी–वाघिरे, पुणे यांच्यातून विभाजनानंतर – फक्त मुलींचे **कन्या विदयालय, पिंपरी वाघेरे पुणे हे विदयालय स्वतत्र झालेले आहे**. त्यामुळे या विदयालयाकडे प्रथम मान्यता मूळ कागदपत्रे नसून , विभाजनाचे महाराष्ट्र शासनाचे –संदर्भिय पत्र हेच प्रथम मान्यता म्हणून वेळोवेळी वापरण्यात येते. सदर विभाजना बाबतचे संदर्भियपत्र सोबत जोडलेले आहे

कळावे,

आपली विश्वासू,

सोबत:–

1) मुला–मुलींची स्वतंत्रशाळा विभाजनाबाबतचे महाराष्ट्र शासनाचे उपरोक्त संदर्भ पत्र

सौ.शेटे एस.एस.

मुख्याध्यापिका
कन्या विद्यालय
पिंपरी वाघेरे, पुणे – ४११ ०१७

महाराष्ट्र शासन

क्रमांक:एसएसएन १३८९/२०९३/माशि-१,
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक:- २७ जून १९९०

प्रति,

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,
पुणे.

विषय:- रयत शिक्षण संस्था, सातारा या संस्थेच्या पुणे व अहमदनगर जिल्हयातील दहा माध्यमिक शाळांच्या विभक्तीकरणाबाबत....

उपरोल्लेखित विषयावरील आपले क्र. माध्य-३/१४/शाळा विभाजन/पुवि/८९, दिनांक २० डिसेंबर, १९८९ चे पत्र कृपया पहावे.

२. नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद म्हणून सोबत जोडलेल्या यादीतील रयत शिक्षण संस्था, सातारा या संस्थेच्या, पुणे व अहमदनगर जिल्हयातील दहा माध्यमिक शाळांचे विभाजन करून प्रत्येक शाळेची, मुलांची आणि मुलींची अशा दोन स्वतंत्र माध्यमिक शाळा, जून १९९० पासून सुरु करण्यास, नेहमीच्या अटींवर व विशेषत: खालील खास अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे:-

१] प्रत्येक शाळेच्या दोन्ही स्वतंत्र माध्यमिक शाळांतील कोणत्याही वर्गासाठी, कोणत्याही परिस्थितीत सरासरी हजेरीची अट शिथिल केली जाणार नाही.

२] प्रत्येक शाळेच्या दोन्ही स्वतंत्र शाळांसाठी स्वतंत्र इमारत, फर्निचर, प्रयोगशाळा ग्रंथालय इत्यादी गोष्टींची व्यवस्था असली पाहिजे.

३] स्वतंत्र मुलींच्या माध्यमिक शाळांसाठी एका मुख्याध्यापकाच्या पदाखेरीज इतर कोणत्याही कर्मचारी वर्गाची नेमणूक करता येणार नाही. तसेच त्यावर होणारा खर्च शासनाकडून मान्य केला जाणार नाही.

याबाबतची आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

[ दी०अ० कारेकर ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी व त्वरीत कार्यवाहीसाठी अग्रेषित.
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

शिक्षणाधिकारी [माध्यमिक], जिल्हा परिषद, पुणे/अहमदनगर.
प्रत अग्रेषित.

सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा

इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, पश्चिम विभाग, पुणे-७.

इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, उत्तर विभाग, अहमदनगर.

निवड नस्ती [दोन प्रती]

केवारी/२६७९०.

शासन पत्र क्र. एसएसएन १३८९/२०९३/माशि-१, दिनांक ७-५-१९८०
चे सहपत्र.

<u>रयत शिक्षण संस्था, सातारा या संस्थेच्या पुणे व अहमदनगर जिल्ह्यातील विभाजनास परवानगी दिलेल्या माध्यमिक शाळांची यादी</u>

पुणे जिल्हा
=========

१] संत तुकाराम विद्यालय, देहू, ता. हवेली.

२] हुतात्मा राजगुरु विद्यालय, पांडवनगर, पुणे.

३] नवमहाराष्ट्र विद्यालय, पिंपरी-वाघिरे, पुणे.

अहमदनगर जिल्हा
======= ======

१] जनता विद्यालय, काष्टी ता. श्रीगोंदा.

२] महात्मा गांधी विद्यालय, प्रवरानगर.

३] न्यू इंग्लिश स्कूल, सात्रळ, ता. राहुरी.

४] नागेश विद्यालय, जामखेड.

५] शारदा विद्यामंदिर, राहता, ता. कोपरगांव.

६] महादजी शिंदे विद्यालय, श्रीगोंदा.

७] श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय, कोळपेवाडी, ता. कोपरगांव

-----o-----